## थोडक्यात पण महत्वाचे



### नेवासा एस टी आगाराचे वरिष्ठ सहायक वासुदेव आव्हाड

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा एस टी आगाराचे आस्थापना विभागाचे वरिष्ठ सहायक वासुदेव भगवान आव्हाड हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.यावेळी एस टी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचा गौरव सत्काराद्वारे करण्यात आला.एस टी च्या उत्कर्षासाठी वासुदेव आव्हाड यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन उयोजक व शिवसेना नेते रामदासजी गोल्हार यांनी यावेळी बोलतांना केले. सेवापूर्ती निमित्ताने नेवासा आगारात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक प्रशांत होले हे होते तर हभप विष्णुदास महाराज सांगळे,उद्योजक रामदास गोल्हार,भिवाजी आघाव,प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष अनिलराव ताके पाटील,बस स्थानक प्रमुख ज्ञानेश्वर मुरदारे,कामगार नेते अशोक क्षीरसागर, भाऊसाहेब आव्हाड,मजले चिंचोलीचे सरपंच अमित आव्हाड,प्रवाशी संघटनेचे सचिव पत्रकार सुधीर चव्हाण, संपतराव कर्डीले,दत्तात्रय कोकणे,रमेश दाणे, कामगार नेते अनिल टाके प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते यावेळी एस टी कामगार संघटनेसह प्रवाशी संघटना, अधिकारी व मित्र परिवार व नातेवाईक मंडळींच्या वतीने वासुदेव आव्हाड व सौ.सुनीता आव्हाड यांचा सेवापूर्ती निमित्ताने सपत्नीक गौरव रामदास गोल्हार,आगार व्यवस्थापक प्रशांत होले,अनिल ताके पाटील यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊलींची व विठ्ठल रुख्मिणीची प्रतिमा देऊन करण्यात आला.आपली म्हणून व एस टीचे हित डोळ्यासमोर ठेऊन कर्मचाऱ्यांनी एस टी ची सेवा करावी असे आवाहन वासुदेव आव्हाड यांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी पुणे येथील इंजिनिअर अतुल पालवे,मदन डोळे,ईश्वर आव्हाड,सोनल आव्हाड,अभिषेक आव्हाड,महादेव दराडे,अंबादास आव्हाड,अतुल सांगळे यांनी मनोगत व्यक्त करत पुढील जीवन प्रवासाला शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर अधिकारी,एस टी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महिला शिक्षित झाल्या तर समाज प्रगत होतो - डॉ. धनंजय मुखेकर



पाथर्डी (स. गांवकरी) : तालुक्यातील मुखेकरवाडी येथील डॉ. धनंजय मुखेकर यांच्या शैक्षणिक संस्थेचे, भैरवनाथ एज्युकेशन संचलित शिवछत्रपती महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यास शासनाकडून नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना व स्व. अशोकरावजी मुखेकर पाटील यांच्या शिक्षणविषयक दूरदृष्टीला अखेर यश मिळाले आहे. शासनाच्या मान्यतेनुसार महाविद्यालयात एम.एस्सी. (रसायनशास्त्र), एम.ए. (इंग्रजी) आणि बी.एस्सी. (क्लिनिकल लॅबोरेटरी सायन्स) हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या सर्व अभ्यासक्रमांमध्ये महिलांसाठी १०० टक्के मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली असून, आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणे शक्य होणार आहे. याबाबत संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय अशोकराव मुखेकर पाटील म्हणाले, "महिला शिक्षित झाल्या तर संपूर्ण कुटुंब आणि समाज प्रगत होतो. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलीपर्यंत उच्च शिक्षण पोहोचविणे हीच आमची बांधिलकी आहे." "तालुक्यातील प्रत्येक घरात एक पदवीधर महिला" हे डॉ. धनंजय अशोकराव मुखेकर पाटील यांचे ध्येय असून, त्याच उद्दिष्टाने संस्था महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील मुलींना गुणवत्तापूर्ण, सुलभ आणि मोफत उच्च शिक्षण उपलब्ध करून देत त्यांना स्वावलंबी व सक्षम बनविण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. महिलांच्या प्रगतीसाठी उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करणारे ठरेल, असा विश्वास डॉ. धनंजय पाटलाने व्यक्त केला आहे.

### वटपौर्णिमेच्या दिवशी अहिल्यानगर शहरातील विवाहित महिला बेपत्ता




अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील केडगाव परिसरातील वैष्णवनगर येथे राहणारी ३६ वर्षीय विवाहित महिला घरातून कोणालाही काहीही न सांगता अचानक निघून गेल्याची घटना समोर आली आहे. संबंधित महिलेचा नातेवाईकांसह परिसरात शोध घेऊनही ती आढळून न आल्याने तिच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वैष्णवनगर, तिरंगा चौक, केडगाव, ५४ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्या पती व मुलगा यांच्यासह वास्तव्यास असून मागील दोन वर्षांपासून त्यांची मुलगी व तिचा मुलगा हेही त्यांच्याकडे राहत आहेत. सोमवारी (२९ जून) वटपौर्णिमेनिमित्त फिर्यादी व त्यांची मुलगी वैष्णवनगर येथील बालवाडी जवळील वडाच्या झाडाची पूजा करण्यासाठी गेल्या होत्या. पूजा करून त्या दुपारी १२.३० वाजता घरी परतल्या. त्यानंतर फिर्यादी घरकामात व्यस्त असताना त्यांची मुलगी घरासमोर बसलेली होती. काही वेळाने तिने आपल्या मुलाला घरीच ठेवले आणि कोणालाही काहीही न सांगता अचानक घरातून निघून गेली. बराच वेळ उलटूनही मुलगी घरी परतली नाही. त्यामुळे तिचा वैष्णवनगर परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला. मात्र ती कुठेही आढळून न आल्याने अखेर कोतवाली पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली. पोलीस तिचा शोध घेत आहेत.

### जमीन व्यवहारात डॉक्टरची फसवणूक; माजी नगरसेवकासह दोघे अटकेत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी माजी नगरसेवक स्वप्नील रोहीदास शिंदे व महेश नारायण कुऱ्हे यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना मंगळवारी (२३ जून) न्यायालयासमोर हजर केले असता सहा दिवसांची (६ जुलैपर्यंत) पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, १५ दिवसांपूर्वीच या गुन्ह्यातील मुख्य संशयित अमोल बबन जाधव (वय ४०, रा. मोरगव्हाण, ता. नेवासा) याला अटक केली होती. आतापर्यंत तिघांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. स्वप्नील शिंदे व महेश कुऱ्हे हे दोघे खून, मोक्का कलमान्वये दाखल गुन्ह्यात अटकेत होते. त्यांना नाशिक कारागृहातून वर्ग करून फसवणूकीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

# वटपौर्णिमेला महिलांनी जपली परंपरा अन् पर्यावरणही

**वडाच्या रोपांच्या लागवडीचा प्रेरणादायी उपक्रम**



मवेशी : (स. गांवकरी)

मवेशी (ता. अकोले) : वटपौर्णिमा म्हणजे केवळ वडाच्या झाडाची पूजा नव्हे, तर भावी पिढ्यांसाठी वडाचे झाड लावून त्याचे संगोपन करणे हीच खरी परंपरा आहे, असा संदेश मवेशी गावातील महिलांनी कृतीतून दिला. पारंपरिक वटपूजनानंतर महिलांनी वडाच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबविला.

पर्यावरण प्रेमी राहुल प्रभाकर राऊत यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गेल्या अनेक महिन्यांपासून गावात वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, प्लास्टिकमुक्ती आणि पर्यावरण जनजागृतीचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून, त्याच अभियानाचा एक भाग म्हणून वटपौर्णिमेनिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

"एक कुटुंब – एक वडाचे झाड" या संकल्पनेला प्रतिसाद देत प्रत्येक कुटुंबाने किमान एक वडाचे रोप लावून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. धार्मिक श्रद्धेला पर्यावरण संरक्षणाची जोड दिल्यास निसर्ग संवर्धनाची मोठी लोकचळवळ उभी राहू शकते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या उपक्रमात राजाराम ठोंबरे, सीमा लोहकरे, मीना भांगरे, सुनीता कोंडार, रत्नमाला भांगरे, शिल्पा भांगरे, दीपाली बोटे, वर्षा लोहकरे, सुरेखा कोंडार, अलका बांबळे, भारती बांबळे, राधिका शेलार, सोनाली भांगरे, सोनाली कोंडार, सविता कोंडार, अनिता कोंडार आणि विमल राऊत यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी महिलांनी "फक्त वडाची पूजा करून थांबायचे नाही, तर प्रत्येक वर्षी एक वडाचे झाड लावून ते जगवायचे," असा संकल्प केला. वाढते तापमान, अनियमित पाऊस, जंगलांचे घटते क्षेत्र आणि हवामान बदल या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाला प्राधान्य द्यावे, असे आवाहनही करण्यात आले.

धार्मिक सणाला सामाजिक आणि पर्यावरणपूरक स्वरूप देणारा मवेशी गावातील हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला असून, इतर गावांनीही अशा प्रकारचे उपक्रम राबवून हरित महाराष्ट्र घडविण्यास हातभार लावावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या इसमास दहा हजारांचा दंड

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील मोनिका चौक येथे दि. २८ जून रोजी सकाळी १०:३० वा. आरोपी नामे संजय कोंडाजी तांबे (वय ४७ वर्षे, रा. ओतूर ता. जुन्नर जि. पुणे) हा दारू पिऊन त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीची थार (गाडी नं. एमएच १४ एलई ११२४) ही ओझर हून ओतूर बाजुकडे दारूच्या नशेत घेवुन येत असताना मिळुन आला असल्याने सदरच्या आरोपी विरूध्द पोलिस प्रशासनाने फिर्यादी दिल्याने त्याचे विरूध्द गु.र.नं. १७९/२०२६ मो.वा. का. कलम १८५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदरच्या आरोपीची प्राथमिक आरोग्य केंद्र ओतूर या ठिकाणी वैद्यकीय तपासणी केली असता, तो दारूच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. सदरच्या आरोपी विरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असता मा. न्यायालयाने सदरच्या आरोपीस दि. २९ जून रोजी दहा हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे. सदरची कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, पुणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलिस हवालदार नामदेव बांबळे, पो.कॉ. शाम जायभाये, पो.कॉ. किशोर बर्डे यांनी केली आहे. सदरच्या कारवाईमुळे दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या चालकांवर वचक बसणार असुन यापुढे दारू पिऊन वाहन चालवताना आढळुन आल्यास त्यांच्यावर कायदेशिर कारवाई केली जाणार असुन दंडा सोबत जेलची हवा सुध्दा खावी लागणार असल्याचे ओतूर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

## संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत संत कबीर साहेब प्रकट दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- २७१ भाविकांनी केले रक्तदान
- सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश - डॉ.विलास मढीकर




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे.रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे.महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे.

या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत संत कबीर साहेब प्रकट दिवस निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात २७१ रक्तपेशव्यांचे संकलन करण्यात आले .

तसेच पाच जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात आले,ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले.यावेळी महाराष्ट्र, कर्नाटक,आंध्र प्रदेश येथून आलेल्यालाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला. मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे संत रामपाल जी महाराज यांच्या उपस्थितीत कबीर साहेब प्रकट दिवसआयोजन केले आहे. या कार्यक्रमाद्वारे शांती, एकता व सेवेचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन आभार व्यक्त करण्यात आला.

## अंजनकुंड-पांडव गुहेला जोडणारा रस्ता रुंद करण्याची मागणी

**जिल्हा परिषद अध्यक्ष राजेशभाई गामीत यांनी राज्यमंत्री जयराम गामीत यांच्याकडे केली लेखी मागणी**

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)



डांग जिल्ह्यातील प्रसिद्ध धार्मिक व पर्यटनस्थळ असलेल्या भगवान हनुमान यांच्या जन्मस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंजनकुंड तसेच ऐतिहासिक पांडव गुहेला जोडणारा रस्ता रुंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या हा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने पर्यटक, स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनचालकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात डांग जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राजेशभाई गामीत यांनी राज्य मंत्री तथा डांगचे प्रभारी मंत्री जयराम गामीत यांना लेखी निवेदन देऊन रस्त्याचे रुंदीकरण तातडीने करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आहवा तालुक्यातील बोरखल मार्गे लिंगा तसेच गलकुंड, कामत आणि बिलमाळ या गावांतून जाणारा रस्ता अंजनकुंड व पांडव गुहेकडे जाणारा प्रमुख संपर्क मार्ग आहे. गेल्या काही वर्षांत धार्मिक पर्यटन आणि निसर्गसौंदर्यामुळे या परिसरात पर्यटकांची संख्या लक्षणीय वाढली आहे. त्यामुळे लहान-मोठ्या वाहनांची वाहतूकही वाढली असून, अरुंद रस्त्यामुळे समोरासमोर येणाऱ्या वाहनांना मार्ग काढताना अडचणी निर्माण होतात. परिणामी अपघाताचा धोका वाढत आहे. राजेशभाई गामीत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, अंजनकुंड आणि पांडव गुहा ही डांग जिल्ह्याची श्रद्धास्थाने तसेच महत्त्वाची पर्यटनस्थळे आहेत. राज्य सरकार या परिसरातील पर्यटन विकासाला प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे सुरक्षित आणि सुसज्ज रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यटनाशी संबंधित व्यावसायिकांचेही मत आहे की, रस्ता रुंद झाल्यास भाविक आणि पर्यटकांची ये-जा अधिक सुलभ होईल, अपघातांचा धोका कमी होईल आणि संपूर्ण परिसराच्या धार्मिक तसेच पर्यटन विकासाला नवी चालना मिळेल. आता राज्य सरकार या मागणीवर किती लवकर सकारात्मक निर्णय घेते आणि रस्त्याच्या रुंदीकरणाला मंजुरी देते, याकडे स्थानिक नागरिक, भाविक आणि पर्यटन क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## कारवाईचा धडाका; HSRP नंबर प्लेटविरोधात महामोहीम सुरू

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- परिवहन मंडळाच्या आदेशानंतर आरटीओ ॲक्शन मोडमध्ये अहिल्यानगर शहरात HSRP नंबर प्लेटविरोधात धडक कारवाई
- RTO चे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शेकडो वाहनांची तपासणी

परिवहन मंडळाने दिलेल्या कडक आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या आदेशानुसार, विना-एचएसआरपी (HSRP - हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) फिरणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध अहिल्यानगर शहरात आजपासून अत्यंत आक्रमक आणि धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. शहरातील मुख्य चांदणी चौक परिसरात आरटीओने थेट रस्त्यावर उतरून या कारवाईला धडाक्यात सुरुवात केली. परिवहन मंडळाच्या आदेशाचे काटेकोर पालन करण्यासाठी आरटीओचे वरिष्ठ अधिकारी स्वतः मोठ्या फौजफाट्यासह चांदणी चौकात उपस्थित होते. शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या, तसेच अद्यापही जुन्या किंवा फॅन्सी नंबर प्लेट वापरणाऱ्या शेकडो वाहनांची जागेवरच कसून तपासणी करण्यात आली आणि दंडात्मक बडगा उगारण्यात आला. आरटीओच्या या अचानक आणि आक्रमक कारवाईमुळे नियम मोडणाऱ्या वाहनधारकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

परिवहन मंडळाच्या आदेशानुसार ही मोहीम यापुढेही अशीच तीव्र गतीने सुरू राहणार असून, वाहनधारकांनी तातडीने एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# भव्य देशी वृक्षारोपण "बिना सहकार नाही उद्धार"चा संदेश

जामखेड : (स. गांवकरी)



सहकार सप्ताहानिमित्त वै विठ्ठलराव ( अण्णा ) राऊत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जामखेड येथील श्री नागेश विद्यालयाच्या प्रांगणात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नागेश विद्यालय स्कूल कमिटीचे सदस्य तथा श्री संत गोरोबा काका कुंभार नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन श्री विनायक राऊत यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पर्यावरण संवर्धनासह सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दिलीपजी तिजोरे साहेब , सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर विभाग सल्लागार समिती सदस्य श्री राजेंद्रजी कोठारी, पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा.मधुकर आबा राळेभात, नगरसेविका हिना सय्यद नगरसेवक मोहन पवार, स्कूल कमिटी सदस्य प्रकाश सदाफुले, सुरेश भोसले प्रा. शिवाजीराव ढाळे, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भोर मॅडम, प्रा.ज्ञानदेव कुंभार , सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार, डॉ. सागर शिंदे, ॲड. अलताफ शेख, प्रदीप टाफरे, वसीम शेख, अनिकेत पवार , विशाल वनवे, कॅप्टन भोरे मेजर, जितेंद्र बोरा, मुख्तार सय्यद ,संतोष बारगजे, आनंद राजगुरू, महेश राऊत ,संभाजी मुळे, नासीर चाचू सय्यद, बाबा चंदन, वनरक्षक किसनराव पवार, वनरक्षक सुधाकर घोडके , महादेव डोके, इमरान तांबोळी, अमोल बहिर, अशोक यादव ,योगेश देशमुख ,मच्छिंद्र गोरे , संतोष गिरी ,अमोल सदाफुले , विकी पिंपळे ,रामेश्वर सूर्यवंशी , यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील प्रतिमा पूजन करून प्राचार्य मडके सर यांनी प्रास्ताविकातून वृक्षसंवर्धनाची गरज आणि सहकार चळवळीचे महत्त्व विशद केले.

अध्यक्षीय भाषणात दिलीप तिजोरे यांनी वाढती वृक्षतोड, बदलते हवामान आणि त्यातून निर्माण होणारे जागतिक संकट याविषयी चिंता व्यक्त केली. "बिना सहकार नाही उद्धार" या घोषवाक्याचा उल्लेख करत सहकाराच्या माध्यमातून दुर्बल घटकांचा विकास, संस्थांची प्रगती आणि समाजहित साध्य होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. मधुकर आबा राळेभात यांनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्यकाळातील दुष्काळाचा संदर्भ देत भविष्यातील पिढीला अशा संकटांना सामोरे जावे लागू नये, यासाठी आजपासून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. युरोपसारख्या थंड प्रदेशातही उष्माघातामुळे झालेल्या मृत्यूंचा दाखला देत त्यांनी पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला.

राजेंद्र कोठारी यांनी पूर्वी रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात असलेल्या वृक्षांची आठवण करून देत सध्या वाढलेल्या वृक्षतोडीबाबत चिंता व्यक्त केली. केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी या उपक्रमासाठी विनायक राऊत यांचे विशेष कौतुक केले.

यावेळी श्री नागेश विद्यालयाच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेत कार्यक्रमात सहभागी नागरिक व विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंगळे सर यांनी केले, वृक्ष लागवडीसाठी एन सी सी ऑफिसर मयुर भोसले व एन सी सी कॅडेट टीम चे विशेष सहकार्य लाभले तर उपस्थितांचे आभार विनायक राऊत यांनी मानले. सहकार सप्ताहानिमित्त आयोजित या वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### तांदलवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप

रावेर (स. गांवकरी) : रावेर तालुक्यातील तांदलवाडी येथील जिल्हा परिषद मराठी मुलांची केंद्र शाळेत शासनाच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह, प्रेरणा व आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी तांदलवाडी ग्रामपंचायत सदस्या सौ. साधना योगेश्वर कोळी, तसेच महाएकता फाउंडेशन तांदलवाडीचे अध्यक्ष श्री. योगेश्वर कोळी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश उन्हाळे, समिती सदस्य सीमा चौधरी, ललिता भोई, शिक्षणतज्ज्ञ अशोक फकीरा महाजन , तसेच शिक्षक श्री. दत्तात्रय तायडे व प्रभाकर गंभिर पाटील ,आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, उपस्थितांनी शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

### अहिल्यानगर मध्ये पुन्हा भरणार अमृत पेठ -थेट बाजारपेठ

अहिल्यानगर (स. गांवकरी) : स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृतपेठ - थेट बाजारपेठ' हा विशेष उपक्रम राबवला जातो. अहिल्यानगरमध्ये मार्च व में महिन्यात भरलेल्या अमृतपेठ थेट बाजारपेठेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले असून, 3,4 व 5 जुलै 2026 रोजी ही अमृतपेठ थेट बाजारपेठ भरणार आहे. अमृत संस्था-अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था-अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठ चे वैशिष्ट्य असून,ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो.

### अहिल्यानगरमध्ये शुक्रवार पासून अमृत पेठ-थेट बाजारपेठ

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अमृत (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर मध्ये पुन्हा शुक्रवार पासून दिनांक 03,04 व 05 जुलै 2026 रोजी शमी गणपती मंदिर हॉल, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे भरणार अमृत पेठ -थेट बाजारपेठ अशी माहिती संयोजकांनी दिली आहे. प्रतिबिंब संस्था व स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृतपेठ-थेट बाजारपेठ' हा विशेष उपक्रम राबवला जातो. अहिल्यानगर मध्ये मार्च व में महिन्यात भरलेल्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला होता.त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले असून, 3,4 व 5 जुलै 2026 रोजी ही अमृतपेठ थेट बाजारपेठ भरणार आहे. अमृत संस्था-अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था-अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठ चे वैशिष्ट्य असून,ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो.अनेक स्टॉल बुक झाले असून काही मोजकेच स्टॉल शिल्लक असून आजच आपला स्टॉल बुक करण्यासाठी संपर्क क्र 9284930674/9112228769 यावर संपर्क करा.

### खानिवली कृषी तंत्र विद्यालयात महाराष्ट्र कृषी दीन साजरा

भिवंडी (स. गांवकरी) : महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त भिवंडी तालुक्यातील खानिवली येथील कृषी तंत्र विद्यालयात मंगळवार, दि. १ जुलै २०२६ रोजी विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कृषी क्षेत्राचे महत्त्व, शाश्वत शेतीची दिशा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये प्राचार्य व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, कृषी क्षेत्रातील नव्या संधी, शाश्वत शेती पद्धती तसेच शेतकऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यालय परिसरात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे विविध प्रकारची रोपे लावून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमातून हरित परिसर निर्माण करण्याचा आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. यावेळी क सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांनी मिळून महाराष्ट्र कृषी दिन उत्साहात साजरा केला. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना, "शेती हा केवळ व्यवसाय नसून जीवनपद्धती आहे. शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी आणि समृद्ध भारत हेच आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे," असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कृषीविषयक जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या पसंतीस उतरला. यावेळी प्राचार्य मिलिंद घरत ,उपप्राचार्य जितेंद्र खरे तर आदी शिक्षक उपस्थित होते.

### बाज गावाजवळ कार आणि दुचाकीची जोरदार धडक; दुचाकीस्वार जखमी

डांग,गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील वघई–सापुतारा आंतरराज्य महामार्गावरील बाज गावाजवळील वळणावर आज कार आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराच्या डोक्याला आणि कानाला दुखापत झाली असून, दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरत येथून कंपनीच्या उत्पादनाच्या प्रचारासाठी नाशिककडे जाणारी कार (क्रमांक GJ-05-JQ-0149) बाज गावाजवळून जात होती. त्याचवेळी समोरून राजस्थानातील एक तरुण आपल्या दुचाकीवर (क्रमांक RJ-33-QA-5800) प्लास्टिकच्या खुर्च्या बांधून कथितपणे रॉंग साईडने येत होता. यावेळी दुचाकीची कारच्या बोनेटला जोरदार धडक बसल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कार आणि दुचाकीचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन जखमी दुचाकीस्वाराला मदत केली. त्यानंतर त्याला प्राथमिक उपचारासाठी वघई येथील सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) येथे दाखल करण्यात आले.

# फिल्टर बसूनही गावांना दूषित पाण्याचा पुरवठा

- तालुक्यात जलजीवन मिशन योजनेत दुर्लक्ष
- कोलठणच्या नळातून पाणी की चिखल
- दूषित पाण्याने आरोग्याचे संकट गडद



मुरबाड : (स. गांवकरी)

पावसाळ्याच्या तोंडावर मुरबाड तालुक्यातील कोलठण ग्रामस्थांच्या आरोग्यावर संकट कोसळले आहे. नळाद्वारे येणारे पाणी इतके गढूळ व पिवळे आहे की ते पिणे तर सोडाच, कपडे धुण्यासाठी आणि अंघोळीसाठीही अयोग्य झाले आहे. पाण्याला दुर्गंधी येत असून त्यात चिखल-मिश्रण दिसत आहे. ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत म्हटले आहे की, "हे पाणी पिण्यासारखे नाही. नळाला नळ आहे, पण पाणी नाही. येणारा चिखल बघून तोंडच वाकडे होते." या दूषित पाण्यामुळे अतिसार, गॅस्ट्रो, कावीळ, त्वचाविकार यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध लोकांना सर्वाधिक धोका आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायत आणि पाणीपुरवठा विभाग 'स्वच्छ पाणीपुरवठा' चा दांडोरा पिटत असले, तरी कोलठणची परिस्थिती संपूर्ण व्यवस्थेची पोलखोल करत आहे. लाखो-करोडो रुपये खर्च करून पाणी शुद्धीकरणासाठी केमिकल-पावडरवर खर्च केला जातो, पण नळातून चिखलच येतो.

ग्रामस्थांनी पाणीपुरवठा विभागाकडे तातडीने पाण्याची गुणवत्ता तपासून नागरिकांना शुद्ध पाणी देण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचवण्याचा उद्देश असला, तरी मुरबाड तालुक्यातील अनेक गावांमध्ये फिल्टर यंत्रणा बसवूनही नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पाण्याला दुर्गंधी येणे, गढूळ पाणी नळाद्वारे येणे तसेच फिल्टर यंत्रणेची नियमित देखभाल न होणे अशा समस्या सातत्याने जाणवत आहेत. अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाल्याचे दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नसल्याचा आरोप होत आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत उभारण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनांची गुणवत्ता, देखभाल आणि संबंधित यंत्रणांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. दूषित पाण्यामुळे पोटाचे विकार, त्वचारोग आणि इतर जलजन्य आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याची तातडीने तपासणी करून दोषी यंत्रणा व संबंधित ठेकेदारांवर कारवाई करावी, तसेच नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

गेल्या दहा वर्षांपासून ज्या काही पाणी योजना राबविल्या त्या पूर्ण अयशस्वी झाल्या आहेत. पूर्वी उच्च प्रतीचे GI पाईप वापरले जायचे. परंतु आता HDPE पाईप वापरामुळे सर्व योजना फेल आहेत. यामध्ये पाईप खरेदीमध्ये खूप भ्रष्टाचार होतोय अशा संतप्त प्रतिक्रिया मुरबाडकर नागरिक देत आहेत.

नागरिकांचा थेट आरोप आहे की, "तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजना कागदावरच चांगली आहे. लाखो रुपये खर्च करून बसवलेले पाणी शुद्धीकरण फिल्टर प्रत्यक्षात बंद अवस्थेत आहेत किंवा निकृष्ट दर्जाचे असल्याने त्यांचा वापर केला जात नाही. परिणामी, करोडो रुपयांच्या योजनेचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचत नाही. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय तालुक्यातील ग्रामस्थ व्यक्त करत आहेत."

> "ज्या ठिकाणी गावांना योजना दिल्या आहेत त्या तीन महिने ठेकेदाराने चालविल्यानंतर जे फिल्टर बसवले आहेत ते गावाने किंवा ग्रामपंचायतेने सुरू ठेवायचे आहेत. त्या ठिकाणी असलेला पाणी सोडणारा कर्मचारी त्यांनी त्याचे योग्य नियोजन करायचे आहे. जलजीवन मिशन कामाला पैसे नसल्याने आतापर्यंत ज्या योजना झाल्या आहेत त्या कशा सुरू ठेवता येतील जेणेकरून गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही व मिळणारे पाणी शुद्ध मिळेल याचे नियोजन ग्रामपंचायतेने करावे."
> **- जगदीश बनकरी (उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पं. स. मुरबाड)**

## शेवटी सत्याचाच विजय; आदिवासींच्या लढ्याला यश – लहू मधे

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या कथित बेकायदेशीर बांधकामांवर लवकरच शासनाकडून कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत असून, संबंधित जमीन मूळ आदिवासी मालकांच्या ताब्यात देण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. या घडामोडींमुळे परिसरातील आदिवासी समाजात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणारे आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष लहू मधे यांनी सांगितले की, शेवटी सत्याचाच विजय झाला. आदिवासींची जमीन बळकावून त्यावर मुनींद्र धर्मार्थ ट्रस्टच्या सतलोक आश्रमाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचे बांधकाम करण्यात आले होते. ही जमीन आदिवासींची असल्याचे सिद्ध करण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मधे यांनी आरोप केला की, या प्रकरणात काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे न्याय मिळण्यास विलंब झाला. अखेर आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी पारनेर तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली.

त्यानंतर पारनेर तहसीलदारांनी भूमी अभिलेख विभागाला संबंधित जमिनीची मोजणी करून ती मूळ आदिवासी मालकांच्या ताब्यात देण्याचे आदेश दिल्याचे सांगण्यात आले. या निर्णयानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## सहकार सप्ताहानिमित्त पर्यावरण रक्षणाचा संदेश

वडगाव आनंद : (स. गांवकरी)




सहकार सप्ताहाचे औचित्य साधून आळेफाटा येथील गोमाता दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या वतीने वडगाव आनंद येथील कळमजाई मंदिर परिसरात बुधवारी भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. 'सहकारातून समृद्धी आणि वृक्षलागवडीतून पर्यावरण रक्षण' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत हिरवेगार नंदनवन फुलवण्याच्या उद्देशाने कडुनिंब, वड, पिंपळ, चिंच, गुलमोहर, करंज यांसारख्या बहुगुणी देशी वृक्षांसह विविध शोभिवंत फुलझाडांची लागवड करण्यात आली. ग्रामीण भागातील सहकार चळवळीबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी समाजाने स्वीकारावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष गणेश वाघमारे, उपाध्यक्ष गणेश रामचंद्र देवकर, सचिव अभिषेक कोकाटे यांच्यासह संचालक मंडळ, आळेफाटा व वडगाव आनंद परिसरातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच वडगाव आनंदचे उपसरपंच गणेश भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ गढे, वैशाली देवकर, ऋषिकेश गढे, महेंद्र भुजबळ, कमलेश मोरे, कळमजाई देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी श्रमदान करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिकमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष गणेश मारुती वाघमारे म्हणाले, "दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत असले तरी निसर्गाचा समतोल बिघडल्यास शेती आणि पशुपालनावर त्याचा थेट परिणाम होतो. वाढते तापमान आणि पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. आम्ही केवळ झाडे लावली नसून ती जगवण्याचाही संकल्प केला आहे."

संस्थेचे सचिव अभिषेक कोकाटे यांनी सांगितले की, वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक झाडाला नियमित पाणी, खत तसेच जनावरांपासून संरक्षणासाठी ट्री-गार्डची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे.

## टाकळी ढोकेश्वर परिसरात पाणीटंचाई तीव्र

**वाढीव पाणीटँकरची ग्रामस्थांची मागणी**

पारनेर : (स. गांवकरी)

टाकळी ढोकेश्वर गाव परिसरात अजून समाधानकारक पाऊस न झाल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्याने नागरिकांसह जनावरांनाही पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि तहसील प्रशासनाकडे वाढीव पाणीटँकर उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, टाकळी ढोकेश्वर येथील निवडुंगेवाडीसाठी सध्या केवळ एकच पाणीटँकर सुरू असून तो अपुरा पडत आहे. परिसरातील पाणीसाठे संपुष्टात आल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे किमान आणखी पाच पाणीटँकर तातडीने मंजूर करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन ग्रामसेवक, गटविकास अधिकारी (पंचायत समिती पारनेर) आणि तहसीलदार पारनेर यांना देण्यात आले. प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित वाढीव पाणीटँकर मंजूर करावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या निवेदनावर युवा नेते विक्रम झावरे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश पायमोडे, मळीभाऊ रांधवण, ओमकार उर्फ बबलू झावरे दत्तात्रय निवडुंगे , किसन धुमाळ, संकेत झावरे (महादू), लहू जाधव, कृष्णा बांडे, मोहन रांधवण,बबलू पाटील झावरे, प्रसाद खिलारी, गणेश झावरे, देवा झावरे,बाळासाहेब झावरे, संतोष खिलारी श्रावण गायकवाड, बाबा गागरे, राहुल बांडे, संजय झावरे, ओंकार गोरडे, भाऊसाहेब झावरे नितीन खोडदे, इंद्रभान गोरडे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पाणीटंचाईमुळे भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




> टाकळी ढोकेश्वर परिसरातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नागरिकांना आणि जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. आम्ही स्वतः पुढाकार घेऊन मोफत टँकर सुद्धा ग्रामस्थांना देत आहोत. पाणीटंचाईची परिस्थितीची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन वाढीव पाणीटँकर मंजूर करावेत, हीच आमची मागणी आहे.
> **- विक्रम झावरे (टाकळी ढोकेश्वर)**



## पालक महिलांनी जपली भारतीय संस्कृतीची परंपरा; विद्यालयात वटपौर्णिमा पूजन

पाथर्डी : (स. गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर येथे वटपौर्णिमेनिमित्त पालक महिलांच्या सहभागातून वटवृक्ष पूजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी सौ. विजया शिंदे व सौ. मीना थोरात यांनी वटपौर्णिमा सणाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व सांगताना वडाच्या झाडाचे पर्यावरणीय महत्त्व, त्याचे दीर्घायुष्य, प्राणवायू निर्मिती, सावली तसेच जैवविविधतेच्या संवर्धनातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहनही केले. यानंतर गावातील विविध महिला पालकांनी पारंपरिक पद्धतीने वटवृक्षाचे पूजन करून भारतीय संस्कृती व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमास प्राचार्य श्री.देविदास सोनटक्के,पर्यवेक्षक श्री. अर्जुन वैरागर तसेच महिला शिक्षिका श्रीमती रुपाली पांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात महिला पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यालय परिसरात भक्तिमय, संस्कारमय व पर्यावरण जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# गौ रक्षणासाठी अभयारण्याची गरज : खा. स्मिता वाघ

**पाल वृंदावन धाम आश्रमात गौ शाळेच्या उदघाटना प्रसंगी खासदार स्मिताताई वाघ यांची शासनाला विनंती**

रावेर : (स. गांवकरी)



गोमूत्रामुळे कर्करोगासारखे आजार आणि तिच्या शेणामुळे शेतात खत व प्रदूषणा वर आळा घालता येते. दैवी कार्यात सुद्धा उपयुक्त आणि गाईचे दूध हॆ अमृततुल्य असल्याने प्रत्येकाने गायींचे रक्षण केले पाहिजे तसेच त्यांचा बळी टाळण्यासाठी त्यांच्यासाठी एक अभयारण्य बांधले पाहिजे. सर्व संतांसोबत आम्ही गायींचे रक्षण करू आणि त्यांच्यासाठी सरकारी मदतीची मागणी करत राहू.असे परम पूज्य संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी आश्रम श्री वृंदावन धाम पाल येथील गौशाळेच्या उदघाटन सोहळा प्रसंगी खासदार स्मिताताई वाघ यांनी भावना व्यक्त केले. रावेर तालुक्यातील श्री वृंदावन धाम पाल आश्रमात विद्यमान पदस्थ श्रधेय संत श्री गोपाल चैतन्य जी महाराज यांच्या सानिध्यात महाराष्ट्र गौसेवा आयोगाच्या गौ वर्धन गौवंश सेवा केंद्र योजने अंतर्गत पाल आश्रमातील श्री हरी गोपाल गौशाळेचे शेड निर्माण कार्य पूर्ण होऊन ,त्याचे लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आले. यामध्ये प्रमुख अतिथी जळगाव च्या खासदार स्मिताताई वाघ,खंडवा चे खासदार श्री ज्ञानेश्वर पाटील, नेपानगर आमदार श्रीमती मंजू दादू, जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे,महामंडलेश्वर स्वामी पवनदास जी महाराज,ह भ प मानेकर बाबा शाश्री, श्री योगी दत्त नाथ जी महाराज, श्री राघवानंद भारती जी महाराज,श्री विशद्धानंद सरस्वती जी महाराज, श्री हरिशरनंद जी महाराज, श्री भरत जी महाराज अंजाळेकर,अनंत प्रकाश शास्त्री जी महाराज,श्री श्याम चैतन्य जी महाराज, श्री विजयदास जी महाराज, युवा नेते श्री धनंजय चौधरी, माजी खासदार हरिभाऊ राठोड, चंद्रशेखर चिखले, भीमसिंग राठोड,डॉ रणजित पाटील, डॉ रोहिदास राठोड, चंद्रशेखर नलावडे,आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम गौ शाळेचे उदघाटन करून दीपप्रज्वलन करून आलेल्या अतिथीचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर मनोगत व्यक्त करतांना पुढे योगी दत्तनाथ जी महाराज यांनी हा आयोग देशभरात लागू करण्यात आलेला नाही तो फक्त महाराष्ट्र सरकारने लागू केला आहे . आणि त्याद्वारे गोशाळांसाठी अनुदान मिळत असून ,अत्यंत चांगले कार्य सुरु आहे परंतु विडंबना ही आहे की देशात सर्वाधिक हिंदू सनातनी असूनही आम्हाला गोशाळांसाठी अनुदान स्वीकारावे लागते. प्रत्येकाला वाटते की आज आपला वाढदिवस आहे म्हणून केक आणि इतर गोष्टींवर पैसे खर्च करण्याऐवजी ते पैसे गोशाळेला दान करून गायीची सेवा करता येईल. चंद्रशेखर नलावडे यांनी आपण शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर टाळला पाहिजे, कारण ती विषारी असतात. हे टाळण्यासाठी, आपण गोमातेचे रक्षण केले पाहिजे आणि जर तिचे शेण शेतात वापरले, तर आपल्याला रासायनिक खतांची गरज भासणार नाही. म्हणून, गोसंरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. श्री मानेकर बाबा शास्त्री महाराज यांनी गोशाळा चालवणे आणि या पुण्यकर्मात सहभागी होणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान मंदिर परिसरात वृक्षारोपणास प्रारंभ

पाथर्डी (स. गांवकरी) : श्री जगदंबा मोहटादेवी देवस्थान, मंदिर परिसरामध्ये आज वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उप आयुक्त श्री नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते करण्यात आला. श्री जगदंबा मोहटादेवी देवस्थान मंदिराचा परिसर अधिक देखणा आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी आता आधुनिक लँडस्केपिंग (भूरचना) तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. केवळ झाडे न लावता, संपूर्ण परिसराचा सुनियोजित विकास करून आकर्षक आणि नियोजनबद्ध वृक्षारोपण करण्यात येणार आहे. मंदिर परिसर आणि आजूबाजूच्या डोंगराळ भागात हजारो विविध वृक्षांची, फुलझाडांची, वेलींची लागवड करण्यात येणार आहे. लँडस्केपिंग कायमस्वरूपी सुंदर राहण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धती वापरली जाणार आहे. पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी स्वयंचलित ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यंत्रणा उभारण्याचे नियोजीत आहे. यामुळे झाडांना गरजेनुसार नियमित पाणी मिळेल. या नियोजनबद्ध लँडस्केपिंगमुळे आगामी काळात मोहटादेवी गड केवळ धार्मिक केंद्र न राहता, एक उत्कृष्ट आणि मनमोहक निसर्ग पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास येईल, असा विश्वास देवस्थान समितीने व्यक्त केला आहे. यावेळी विश्वस्त तथा सहा.धर्मादाय आयुक्त विशाल शेंडे, ॲड. विक्रम वाडेकर , ॲड. प्रसन्न दराडे, ॲड. कल्याण बडे, शशिकांत दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, अशोक दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शुभम दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, पुजारी भूषण साकरे तसेच कर्मचारी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## 'त्या' ठिकाणच्या दिशादर्शक फलकाचे अवलोकन करा !

सोलापूर (स. गांवकरी) : मागील वर्षी जवळपास ४३ लाख रुपये खर्च करून ऐन वारीच्या तोंडावर हे फलक जगोजागी लावण्यात आले. यावर फलकांवर नक्की काय लिहलंय हे अगदी १० फूट अंतरावरून देखील नीट दिसून येत नव्हते. हि बाब आम्ही तेव्हाही आणि पुढे वर्षभर पालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत आलो मात्र एवढा मोठा खर्च करूनही ज्या पद्धतीने फलक बसविले गेले त्यावर प्रशासन ज्यांचे ऐकते अशा कुठल्याही नेत्याला दखल घ्यावी वाटली नाही.आता तर मागील वर्षी बसविले गेलेले अनेक ठिकाणचे दिशादर्शक फलकच गायब झाले आहेत. आणि आता यंदा याच दिशादर्शक फलकांवर अक्षरे लहान आहेत म्हणून जवळपास ६३ लाख रुपये अपेक्षित खर्चाची निविदा काढण्यात आली आहे. आता शहरात नव्याने दिशादर्शक फलक बसविले जाणार आहेत.मागील वर्षी पेक्षा २० लाखाने एस्टीमेट वाढवून.(शहरातील कामे नगरपालिकेऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करून घ्यावीत असा कायमचा आग्रह होता आणि बांधकाम विभागाचे बजेट कदाचित जास्त असल्यामुळे इस्टिमेट वाढले असावे). दखल मागील वर्षीही घेतली गेली नाही आणि आताही घेतली जाईल वाटत नाही.



## गाडी लोहार समाज प्रगती मंडळ रावेर तर्फे तहसिलदारांना निवेदन

रावेर (स. गांवकरी) : मुंबई येथील मयंक लोहार या तरुणाच्या हत्येच्या निषेधार्थ मुंबई येथील रेल्वे प्रवासात मयंक लोहार यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येच्या निषेधार्थ म्हणून रावेर येथिल गाडी लोहार समाज प्रगती मंडळ रावेर तर्फे तहसील कार्यालय, रावेर व रावेर तालुका पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले. यावेळी आरोपीला जास्तीत जास्त कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी समाजाचे अध्यक्ष विजय लोहार, लक्ष्मीकांत लोहार संजय लोहार सचिन लोहार, सचिव विशाल राठोड, कैलास लोहार राजेंद्र लोहार उपेंद्र लोहार अल्पेश लोहार गणेश लोहार हे उपस्थित होते.

## मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम सुरू; 'बीएलओ' थेट मतदारांच्या दारी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार श्रीगोंदा तालुक्यात मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्यासाठी विशेष मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेसाठी तालुक्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, आता ते प्रत्यक्ष मतदारांच्या घरी जाऊन माहितीची पडताळणी करणार आहेत. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेदरम्यान बीएलओ प्रत्येक घराला भेट देऊन मतदारांच्या नावांची, पत्त्याची व इतर तपशीलांची प्रत्यक्ष पडताळणी करतील. पात्र नागरिकांना नवीन मतदार नोंदणीसाठी आवश्यक अर्जही उपलब्ध करून दिले जाणार आहेत. अर्जावर संबंधित मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा आवश्यक असून, त्यासोबत दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडणे बंधनकारक आहे. भरलेल्या अर्जाची एक प्रत मतदाराकडे राहणार असून दुसरी प्रत बीएलओकडे जमा करावी लागणार आहे. या पुनर्निरीक्षण मोहिमेत मतदार यादीतील नावांमधील चुका, पत्ता बदल, आवश्यक दुरुस्त्या तसेच विवाहित महिलांच्या माहेरच्या माहितीचीही पडताळणी केली जाणार आहे. यावेळी वयाच्या निकषानुसारही माहिती घेतली जाणार आहे. ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या मतदारांनी २००२ च्या मतदार यादीतील आपला भाग क्रमांक व अनुक्रमांक सांगणे अपेक्षित आहे. तर ४० वर्षांखालील मतदारांनी त्यांच्या आई, वडील, आजी किंवा आजोबा यांपैकी कोणत्याही एका व्यक्तीचा २००२ च्या मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक उपलब्ध करून द्यावा लागेल. यासंदर्भातील माहिती बीएलओंकडे उपलब्ध असणार आहे.

# कार्तिकेयन यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले कौतुक

### असे जिल्हाधिकारी कार्यालयात पहिल्यांदाच घडले






महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील नियम 3(1) नुसार पदावधी पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची नियतकालिक बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी, सामान्य प्रशासन विभागाच्या 9 एप्रिल 2018 च्या शासन निर्णयानुसार स्वीकारलेल्या समुपदेशन धोरणानुसार सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील बदल्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सर्व शाखांतर्गत 90 कर्मचाऱ्यांच्या बदल्या यंदा प्रथमच समुपदेशन पद्धत तसेच संगणकीय प्रणालीचा प्रभावी वापर करून करण्यात आल्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्या समुपदेशनाद्वारे पारदर्शकपणे पूर्ण केल्या असून कर्मचारी वर्गामध्ये समाधान असल्याने कार्यालयीन कामकाजाला गती मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या नियतकालिक बदली 2026 च्या अनुषंगाने दि. 18/06/2026 रोजीच्या ज्ञापनाद्वारे महसूल सहाय्यक-16, सहाय्यक महसूल अधिकारी-26, ग्राम महसूल अधिकारी-32, मंडळ अधिकारी-11 व वाहनचालक-5 अशा एकूण 90 कर्मचाऱ्यांचे बदलीचे ज्ञापन प्रसिद्ध करण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाच्या 9 एप्रिल 2018 च्या शासन निर्णयातील टप्पा क्र. 05 (4) नुसार सर्व विभागातील रिक्त पदे समप्रमाणात भरावीत तसेच अवघड क्षेत्रातील पदे प्राथम्याने भरण्याबाबत निर्देश आहेत.

नागरी सेवा मंडळाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या उपस्थितीत दि. 30.06.2026 रोजी सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांना समुपदेशनासाठी बोलविण्यात आले. समुपदेशनाद्वारे बदलीची शिफारस करताना कर्मचाऱ्यांचा पसंतीक्रम, प्राधान्यक्रम व यापूर्वी सेवा केलेली ठिकाणे यांचा विचार करून प्रशासनाची निकड लक्षात घेण्यात आली. प्रथम सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे पसंतीक्रम व प्राधान्यक्रमानुसार पद निवडण्याची संधी देण्यात आली. उर्वरित कर्मचाऱ्यांना समानीकरणाअंती उपलब्ध पदे निवडण्याची मुभा देण्यात आली.

ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम 2026 साठी नेमणूक करण्यात आली आहे, त्यांना कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित कार्यालय प्रमुखांना देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व संवर्गाचे नियतकालिक बदली-2026 चे कामकाज लोकाभिमुख व पारदर्शी पद्धतीने पार पडले. पहिल्यांदाच संगणकीय सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करून बदली प्रक्रिया राबविल्याने सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्रशासनाची निकड लक्षात घेऊन कार्यवाही केल्याने सर्वांना पसंतीक्रमानुसार बदली करणे शक्य नसले तरी प्रक्रिया पारदर्शक झाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

समुपदेशन पद्धतीने बदली झाल्याने सर्व संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार बदली मिळाल्याने काम करण्याचा उत्साह वाढला आहे. कोणत्याही तक्रारीविना बदली प्रक्रिया पूर्ण झाल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. याबाबत तलाठी संघटना, महसूल कर्मचारी संघटना तसेच वाहनचालक संघटनेने प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# "अण्णांचे आरोग्य जपा; उपोषणाची वेळ येऊ देऊ नका!"

पारनेर : (स. गांवकरी)

पावसाळी अधिवेशनात आमदार काशिनाथ दाते यांची शासनाकडे भावनिक साद; माहिती अधिकाराच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन २०२७ मध्ये औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या प्रस्तावित उपोषणाचा विषय अत्यंत संवेदनशीलपणे सभागृहात उपस्थित करत शासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. सभागृहात बोलताना आमदार दाते म्हणाले की, "अध्यक्ष महोदय, औचित्याचा मुद्दा सुरू करण्यापूर्वी मी आपल्या माध्यमातून शासनाकडे एक महत्त्वाची विनंती करू इच्छितो. माझ्या २२४ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात पद्मभूषण अण्णासाहेब हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांसारखे दोन थोर समाजसेवक आहेत. माहिती अधिकार कायद्यातील सुधारणांच्या संदर्भात अण्णांनी येत्या ५ जुलैपासून उपोषणाचा इशारा दिला आहे. अण्णांचे वय आज ९० वर्षे असून अशा वयात उपोषणाचा शारीरिक त्रास सहन करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे माझ्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने शासनाला विनंती करतो की, अण्णांवर उपोषण करण्याची वेळ येऊ नये, यासाठी तातडीने सकारात्मक संवाद साधून मार्ग काढावा." आमदार दाते सरांनी अण्णासाहेब हजारे यांच्याविषयी व्यक्त केलेली ही आत्मीयता आणि त्यांच्या आरोग्याबाबत व्यक्त केलेली चिंता सभागृहाचे विशेष लक्ष वेधून घेत होती. मतदारसंघातील ज्येष्ठ समाजसेवकांचा सन्मान राखत, त्यांच्या आंदोलनामागील विषयावर शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी स्पष्ट अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# पारनेरकरांसाठी आणखी ४ कोटीचा निधी मंजूर

### पारनेरकरांच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे मानले आभार



पारनेर : (स. गांवकरी)

शिवसेनेत जाहीर प्रवेश केल्यानंतर सुजित झावरे पाटील यांनी पारनेर शहराच्या विकासाचा धडाका लावला आहे. अनेक वर्षांपासून रखडलेला पारनेरचा डीपीआर (DPR) मंजूर करून आणल्यानंतर, काही दिवसांपूर्वीच मंजूर झालेल्या २ कोटींच्या निधीसह, आज पारनेर शहरासाठी आणखी ४ कोटी रुपयांचा असा एकूण ६ कोटी रुपयांचा निधी पारनेरकरांच्या सेवेसाठी उपलब्ध झाला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून हा निधी मिळाला असल्याची माहिती सुजित झावरे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. सुजित झावरे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पारनेरच्या प्रलंबित प्रश्नांना गती दिली आहे. पहिल्या टप्प्यात २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, ज्यातून खालील कामे केली जाणार आहेत:

पारनेर ते सिद्धेश्वर वाडी रस्ता सुधारणा. पारनेर ते बुगेवाडी रस्ता काम. पारनेर शहर दशक्रिया घाट पार्किंग व्यवस्था आणि काँक्रिटीकरण.आता नव्याने मंजूर झालेल्या ४ कोटींच्या निधीमुळे पारनेर शहरातील अंतर्गत रस्त्यांचे जाळे आणि पायाभूत सुविधा अधिक बळकट होणार आहेत. आगामी काळातील 'मास्टर प्लॅन' पत्रकार परिषदेत बोलताना सुजित झावरे पाटील यांनी पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प जाहीर केला. ते म्हणाले: "पारनेर ही बाराशे ऋषींची पुण्यभूमी आहे. या पवित्र नगरीचा विकास करणे आमचे कर्तव्य आहे. या ६ कोटींच्या निधीनंतर आगामी काळात पारनेर शहरासाठी अद्ययावत पाणीपुरवठा योजना, सर्व प्राचीन देवस्थानांचा पुनर्विकास, सौर ऊर्जा प्रकल्प, आणि सर्व वाडी-वस्त्यांवरील रस्ते व पथदिवे बसवून त्यांचे लोकार्पण करणार आहोत." सुजित झावरे पाटील यांच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे पारनेरकरांमध्ये आनंदाचे वातावरण असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या माध्यमातून आलेल्या या निधीमुळे पारनेर शहराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार आहे.

# नैतिक मूल्ये पाळून व्यवसाय करा : डॉ. विजय कानिटकर




सोलापूर : (स. गांवकरी)

समाजाच्या शारीरिक व आर्थिक स्वास्थ्य रक्षणात डॉक्टर्स व सनदी लेखापालांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते त्यामुळे ती त्यांनी सचोटीने, कर्तव्यबुद्धीने नैतिकता पाळून व्यवसाय करण्याचे आवाहन ज्येष्ठ व सुप्रसिद्ध सर्जन डॉ. विजय कानिटकर यांनी केले. ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी (शिवदारे कॉलेज) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे व सी.ए. डे च्या निमित्त नामांकित व सामाजिक बांधिलकी पाळून व्यवसाय करणाऱ्या सहा डॉक्टर्सचा व दोन सनदी लेखापालांचा वि.गु.शिवदारे फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित सत्कार सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे होते. सोलापूर शहरातील ख्यातनाम सनदी लेखापाल (सी.ए.) श्रीधर रिसबुड, सी.ए. चंद्रकांत रच्चा,सोलापूरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जनरल फिजिशियन डॉ. राजेंद्र अग्रवाल, कान, नाक, घसा तज्ञ डॉ. विद्याधर बोराडे, हृदयविकारतज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. रिझवान-उल-हक, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर, नवजात शिशु व बालरोगतज्ञ डॉ. प्रशांत गाडे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष, सोलापूरचे अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह, भेटवस्तू, बुके व शाल घालून सत्कार करण्यात आला. सर्व गौरवमूर्तींनी सत्कारामुळे यापुढे अधिक उत्साहाने व जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे विश्वस्त प्रा. शेटे म्हणाले की, समाजात सचोटीने काम करणाऱ्या माणसांची दखल घेतली जाते त्यांचे कौतुक आवश्यक असते. प्रारंभी पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सत्कारमूर्तींचा परिचय डॉ. आयेशा रंगरेज व प्रा. वैष्णवी गाजूल यांनी करून दिला. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. सोमनाथ पाटील यांनी मानले. यावेळी कविवर्य मारुती कटकधोंड, जेष्ठ सनदी लेखापाल एस. बी. पांढरे, सिद्धाराम कोथली, म.सा.प. जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, वृत्तपत्र लेखक मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख, पांडुरंग कुलकर्णी, ॲड. आर. एस.पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.



# सोलापुरात सर्वधर्म एकता मंचाचे पोलीस आयुक्तांना निवेदन

- नाझिया इलाही खान यांच्यावर कारवाईची मागणी

सोलापूर : (स. गांवकरी)

सर्वधर्म एकता मंच, सोलापूरच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना निवेदन देऊन नाझिया इलाही खान यांनी इस्लाम धर्माचे प्रेषित पैगंबर मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व माँ आयेशा यांच्याविषयी कथितरीत्या केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात संबंधित व्हिडिओची सत्यता व फॉरेन्सिक पडताळणी करण्यात यावी, प्रथमदर्शनी गुन्हा आढळल्यास भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत तात्काळ एफआयआर नोंदवावा, तसेच प्रकरणाचा निष्पक्ष, पारदर्शक आणि जलद तपास करून समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सर्वधर्म एकता मंचाचे संस्थापक अध्यक्ष रसूल पठाण यांनी, "प्रेषित मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. कोणत्याही धर्माच्या श्रद्धास्थानांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न होऊ नये," असे मत व्यक्त केले. सर्वधर्म एकता मंचाच्या या निवेदनातून धार्मिक सलोखा, सामाजिक शांतता आणि कायद्याचा सन्मान कायम राखण्याची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे.

# शिरीष वळसंगकरांच्या कुटुंबातील संपत्तीचा वाद विकोपाला

### जावई सुजय फडकेंविरोधात विनयभंगचा गुन्हा

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापुरातील दिवंगत मेंदूरोगतज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या कुटुंबातील संपत्तीचा वाद विकोपाला पोहोचला आहे; डॉक्टरांचे जावई सुजय फडकेंविरोधात विनयभंगचा गुन्हा त्याच्या सुनेने दाखल केला आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर यांचे जावई सुजय फडके आणि त्यांच्या नात्यातील एका महिलेसोबत मागील काही दिवसापासून संपत्तीच्या मुद्यावरून वाद सुरु आहेत. जानेवारी 2026 ते जून 2026 च्या काळात संशयित आरोपी सुजय फडके यांनी पीडित महिलेला घरातून येण्या-जाण्यास मज्जाव करणे, पीडितेच्या परवानगी शिवाय तिच्या घरात सीसीटीव्ही लावणे, तसेच विज-पाणी पुरवठा बंद करून त्रास देणे अशा प्रकारे त्रास देत विनयभंग केल्याची फिर्याद पीडितीने दिली आहे. या तक्रारीनंतर सोलापुरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात संशयित आरोपी सुजय फडके यांच्या विरोधात विनयभंग केल्याच्या गुन्हा नोंद करण्यात आला आहे. डॉ. शिरीष वळसंगकर यांनी केली होती आत्महत्या- 18 एप्रिल 2025 रोजी सोलापुरातील प्रसिद्ध मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या केली होती. त्यानंतर त्यांच्या कुटुंबातील सुजय फडके आणि पीडित महिलेत संपत्तीच्या मुद्यावरून वाद सुरु होते. या वादातून मागील 15 दिवसापासून पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूच्या लोकांच्या चकरा देखील सुरु होत्या. मात्र आता हा संपत्तीचा वाद विकोपाला गेल्याचे पाहायला मिळतं आहे. डॉ. शिरीष वळसंगकर हे सोलापुरातील न्युरोफिजिशियन होते. त्यांचे वय 69 वर्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली S P Institute of Neurosciences हे अत्याधुनिक सुविधांसह रुग्णालय त्यांनी उभारलं आहे. डॉ. वळसंगकर यांनी सोलापूरमधील दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी डॉ. व्ही.एम. मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून MBBS, MD चे शिक्षण घेतले. लंडनमधील रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्समधून MRCP (UK) ही पदवीही मिळवली आहे. देशभरातील नामांकित मेंदूविकार तज्ज्ञांमध्ये त्यांचा नावलौकिक होता. 1999 मध्ये हॉस्पिटल रुग्ण सेवेत आले. कर्नाटक, तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागातील अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे त्यांचे एसपीएम न्यूरो हॉस्पिटल आहे. न्यूरोलॉजी संबंधी निदान, उपचार, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, संशोधनासाठी त्यांचे हॉस्पिटल मानांकित होते. मेंदू विकारासंदर्भातील शस्त्रक्रियावरील उपचाराचे शोधनिबंध त्यांनी देश, विदेशातून सादर केले आहेत. कोल्हापूरच्या सीपीआर हॉस्पिटल, कुर्डुवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे इंटर्नशीप तर डॉ. व्हीएम मेडिकल कॉलेजमधून पदव्यूत्तर प्रशिक्षण पूर्ण केले. लंडनमधील मैदा वेल न्यूरोलॉजिकल हॉस्पिटल येथे त्यांनी काहीकाळ प्रशिक्षण घेतले. बॉम्बे हॉस्पिटलमधून त्यांनी रुग्णसेवेला सुरुवात केली. वैद्यकीय सेवेशिवाय देखील ते प्रचंड हौशी होते. भारतभर प्रवास करण्यासाठी त्यांनी स्वतःचे विमान देखील खरेदी केले होते. देशातील विविध भागात ते याचं विमानाने फिरत होते. इतकंच नाही तर अनेक शिकाऊ वैमानिकांना देखील त्यांनी मार्गदर्शन केले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांचा पत्रकारांकडून सत्कार!


नवी मुंबई (स. गांवकरी) : कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, राजू मीर, अब्दुल कलाम, मिताली इंटरप्राइजेसचे संचालक बाळासाहेब जगताप, निलेश कदम यांच्यासह अन्य पत्रकार उपस्थित होते. उपस्थितांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांना दैनिक समर्थ गांवकरी दैनंदिनी व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले तसेच कोपरखैरणे परिसरात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस प्रशासन प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करत पुढील यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

### आरोग्य अभियानातील १५,०१० कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

- १० वर्षांहून अधिक सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा शासन निर्णय जारी

मुंबई (स. गांवकरी) : राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक १,१५३.६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देणारा शासन निर्णय आज निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी विशेष पाठपुरावा केला असून त्यानुसार आज हा शासन निर्णय घेण्यात आला. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी या निर्णयात सुधारणा करण्यात आली. तसेच, या कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी निकष निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार आजचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

### सीए अंतिम परीक्षेत आदित्य नाळेचे प्रथम प्रयत्नात घवघवीत यश



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) च्या चार्टर्ड अकाउंटंट (CA) अंतिम परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी (रेल्वे स्टेशन) येथील रहिवासी तथा सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेल्या आदित्य दिपक नाळे याने मे २०२६ सत्रात वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी प्रथम प्रयत्नात दोन्ही गट उत्तीर्ण होत चार्टर्ड अकाउंटंट ही प्रतिष्ठेची पदवी संपादन केली आहे. विशेष म्हणजे, आदित्यने सीए फाउंडेशनपासून सीए फायनलपर्यंतचा संपूर्ण प्रवास सातत्यपूर्ण यशासह पूर्ण केला. यंदाच्या सीए अंतिम परीक्षेत देशभरातील २३ हजार ७७६ विद्यार्थ्यांनी दोन्ही गटांची परीक्षा दिली होती. त्यापैकी केवळ ३ हजार ३४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्णतेचे प्रमाण १४.०७ टक्के इतके राहिले आहे. अशा कठीण स्पर्धेत प्रथम प्रयत्नात मिळवलेले आदित्यचे यश विशेष उल्लेखनीय मानले जात आहे. या यशामागे आदित्यचे कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि समर्पित अभ्यास असल्याचे बोलले जात आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नाळे कुटुंबीयांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, ज्येष्ठ नेते कैलासराव पाचपुते, लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, सहकार महर्षी काष्टी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आदित्यचे अभिनंदन करून त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### राज्यव्यापी 'शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा'चा शुभारंभ





अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नावर जनजागृती निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने ५ जुलै रोजी राळेगणसिद्धी येथून राज्यव्यापी 'शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा' व पदाधिकारी सन्मान अभियानाचा शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली. पारनेर तालुका हा क्रांतीकारक, राष्ट्रभक्त आणि समाजसेवकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. याच भूमीतून समाजकार्यासाठी आयुष्य समर्पित करणारे अण्णा हजारे यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्याच पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी-नारायणगव्हाण शिवरस्त्याच्या प्रश्नातून सुरू झालेल्या संघर्षाने आज राज्यव्यापी चळवळीचे रूप धारण केले आहे. शरद पवळे म्हणाले की, "माझा रस्ता होवो अथवा न होवो, जोपर्यंत शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता मिळत नाही, तोपर्यंत संघर्ष थांबवणार नाही," या संकल्पनेतून शिव पाणंद शेतरस्ता चळवळीची उभारणी झाली. 'शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी' हा संदेश घेऊन चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. ते म्हणाले की, ही चळवळ कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, शेतरस्ते अडवून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आणि प्रशासकीय त्रुटींमुळे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आहे. शेतरस्ता बंद झाल्यास केवळ मार्ग बंद होत नाही, तर शेतकरी कुटुंबाचे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक नुकसान होते. अनेकदा वाद, न्यायालयीन संघर्ष, आर्थिक संकट, नातेसंबंधातील दुरावा, तसेच आत्महत्या व हत्यांसारख्या दुर्दैवी घटनांनाही अशा परिस्थितीमुळे खतपाणी मिळते, असे त्यांनी सांगितले. शेतरस्त्यांच्या प्रश्नावर न्यायालयीन लढ्यात ॲड. प्रतिक्षा काळे यांनी प्रभावी बाजू मांडत महत्त्वपूर्ण यश मिळवून दिले. अर्ज केल्यानंतर ६० दिवसांत निशुल्क हद्दनिश्चितीसह शिवरस्ता खुला करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरले. त्याचबरोबर शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून नकाशावरील रस्ते, प्रलंबित शेतरस्ता प्रकरणे आणि शेतकऱ्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडण्यात आल्या.

# निष्ठावंत : प्रभाकर दादा फापाळे यांचे नाव अग्रस्थानी

## तालुकाप्रमुखपदासाठी कार्यकर्त्यांकडून जोरदार मागणी

लिंगदेव : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यात गेली अनेक दशके शिवसेनेच्या विचारांशी एकनिष्ठ राहून पक्षसंघटना मजबूत करणे, जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणे आणि सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणे, अशी ओळख निर्माण करणारे लिंगदेव गावचे माजी सरपंच प्रभाकर (दादा) फापाळे यांचे नाव आजही तालुक्यातील निष्ठावंत शिवसैनिक म्हणून अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक, राजकीय आणि जनआंदोलनातील कार्यामुळे तालुक्यातील अनेक शिवसैनिक, पदाधिकारी व नागरिक त्यांच्याकडे अनुभवी आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून पाहत असून, त्यांच्यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अकोले तालुकाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून जोर धरत आहे.

प्रभाकर दादा फापाळे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात नेहमीच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. लिंगदेव ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून काम करताना गावाच्या विकासासाठी लोकसहभागातून विविध विकासकामे राबविली. सामाजिक ऐक्य, ग्रामविकास, मूलभूत सुविधा आणि जनसहभाग यावर भर देत त्यांनी आदर्श नेतृत्वाची छाप उमटवली.

सन १९९१ मध्ये लिंगदेव ग्रामपंचायतीचे सरपंच असताना त्यांनी गावात दारूबंदी लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. ग्रामस्थांच्या सक्रिय सहकार्याने व्यसनमुक्तीची जनजागृती करत सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यानंतर समाजप्रबोधनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या दारूबंदी चळवळीतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. गाव आणि परिसर व्यसनमुक्त व्हावा, युवकांचे भविष्य सुरक्षित व्हावे आणि समाजात सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने त्यांनी विविध जनजागृती मोहिमा, बैठका आणि आंदोलनांमध्ये अग्रभागी राहून काम केले.

ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांवरही त्यांनी सातत्याने संघर्ष केला. लिंगदेव आणि परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना दर्जेदार वीजपुरवठा मिळावा यासाठी शिदवड फाटा येथे आंदोलन करून लिंगदेव येथे विद्युत उपकेंद्र (सबस्टेशन) उभारण्याची मागणी त्यांनी जोरदारपणे लावून धरली. या आंदोलनात त्यांनी अग्रभागी भूमिका बजावत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे लिंगदेव येथे विद्युत उपकेंद्र उभारणीच्या प्रक्रियेला गती मिळाली आणि परिसरातील वीज व्यवस्थेत सुधारणा होण्यास मोठी मदत झाली.

मुळा खोऱ्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठीही प्रभाकर दादा फापाळे यांनी सातत्याने आवाज उठविला. सन १९९५ मध्ये मुळा नदीवरील तुटलेल्या केटी वेअरच्या पुनर्बांधणीसाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला. तत्कालीन पाटबंधारे मंत्री गुलाबराव गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या पाणी परिषदेत त्यांनी मुळा नदीवर केटी वेअर उभारण्याची आवश्यकता ठामपणे मांडली. मुळा खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी केटी वेअर उभारण्याची मागणी त्यांनी प्रभावीपणे लावून धरली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे वाघापूर केटी वेअर प्रकल्पाच्या कामाला चालना मिळाली. तसेच मुळा विभागातील पाणीप्रश्न, सिंचन, दुष्काळी परिस्थिती आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर त्यांनी अनेक आंदोलने करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी वेळोवेळी लोकशाही मार्गाने संघर्ष केला. पाणी, वीज, शेती, रस्ते, ग्रामविकास, सामाजिक प्रश्न आणि जनहिताच्या विविध विषयांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला. त्यामुळे अकोले तालुक्यात ते संघर्षशील आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षावर विविध राजकीय संकटे आली, अनेक घडामोडी घडल्या, तरी प्रभाकर दादा फापाळे यांनी पक्षाशी असलेली निष्ठा कधीही डळमळू दिली नाही. पक्षाच्या विचारांवर ठाम विश्वास ठेवत त्यांनी तळागाळातील शिवसैनिकांना एकत्र ठेवण्याचे, संघटना मजबूत करण्याचे आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम सातत्याने केले. त्यामुळे त्यांची ओळख केवळ माजी सरपंच किंवा पदाधिकाऱ्याची नसून आयुष्यभर पक्षासाठी झटणाऱ्या निष्ठावंत शिवसैनिकाची बनली आहे.

## ठाणे जिल्हा ग्रामीणमध्ये पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे : (स. गांवकरी)

- १,६९९ लसीकरण बूथवर १ लाख १७ हजारांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत ठाणे जिल्हा ग्रामीणमध्ये रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्याची व्यापक मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी, कल्याण आणि अंबरनाथ या पाच तालुक्यांमध्ये एकूण १,६९९ लसीकरण बूथवर १ लाख १७ हजार २४९ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. तालुकानिहाय आकडेवारीनुसार शहापूर तालुक्यात ४९० बूथवर अपेक्षित २७,४०० बालकांपैकी २६,१७३ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला. मुरबाड तालुक्यात ३३० बूथवर अपेक्षित १२,०५० बालकांपैकी ११,६९२ बालकांचे लसीकरण करण्यात आले. भिवंडी तालुक्यात ४४५ बूथवर अपेक्षित ४१,०५२ बालकांपैकी ३५,६७३ बालकांना डोस देण्यात आला. कल्याण तालुक्यात २३५ बूथवर अपेक्षित २८,७५२ लाभार्थ्यांपैकी २५,९५२ बालकांचे लसीकरण करण्यात आले, तर अंबरनाथ तालुक्यात १९९ बूथवर अपेक्षित १९,१६३ बालकांपैकी १७,७५९ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्यात आला. या मोहिमेचा शुभारंभ प्राथमिक आरोग्य केंद्र पडघा, भिवंडी येथे आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे, ता. कल्याण येथे आमदार राजेश मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पल्स पोलिओ अभियानाचा प्रारंभ झाला.

## बेवारस आढळल्या दुग्धजन्य पावडरच्या ५० ते ६० गोण्या!

- भेसळ कारवाईच्या भीतीने टाकल्याची चर्चा
- प्रशासनाकडून तातडीने चौकशीची मागणी



राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासनामार्फत भेसळीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कारवाईच्या धास्तीनेच हा दुग्धजन्य साठा वनक्षेत्रात टाकून दिला असावा, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. मात्र, या दाव्याला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नसून तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

जामखेड : (स. गांवकरी)

राज्यात अन्नभेसळीविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये चांगलीच धास्ती निर्माण झाली असून, त्याच पार्श्वभूमीवर जामखेड तालुक्यातील दिघोळ–तेलंगशी रस्त्यालगत वन विभागाच्या हद्दीत अज्ञात व्यक्तींनी दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरसदृश पदार्थाच्या तब्बल ५० ते ६० गोण्या बेवारस अवस्थेत टाकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. २६ जून रोजी परिसरातील एका शेतकऱ्याच्या निदर्शनास वन विभागाच्या जागेत मोठ्या प्रमाणात पावडरने भरलेल्या गोण्या आल्या. संबंधित शेतकऱ्याने तातडीने दिघोळचे सरपंच दशरथ राजगुरू यांना याची माहिती दिली. त्यानंतर सरपंच राजगुरू यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. गोण्यांचा एवढा मोठा साठा रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तींनी येथे आणून टाकल्याचा प्राथमिक अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. घटनेची गंभीर दखल घेत सरपंच दशरथ राजगुरू यांनी तात्काळ खर्डा पोलीस ठाणे तसेच वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर खर्डा पोलीस आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. विशेष म्हणजे, या परिसरात खर्डा, तेलंगशी, दिघोळ, माळवाडी, जायभायवाडी, मोहरी आणि जातेगाव आदी गावांमध्ये अनेक दूध संकलन केंद्रे कार्यरत आहेत. त्यामुळे या बेवारस गोण्यांचा आणि दुग्ध व्यवसायाचा काही संबंध आहे का, याबाबतही विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

दरम्यान, या गोण्यांमध्ये नेमका कोणता पदार्थ आहे, तो निकृष्ट दर्जाचा, भेसळयुक्त किंवा वापरास अयोग्य आहे का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने अथवा पशुपालकाने या पावडरचा जनावरांच्या खाद्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करू नये, तसेच या पदार्थापासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची वन विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी तातडीने सखोल चौकशी करून संबंधित पदार्थाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, तसेच हा साठा येथे टाकणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सध्या या सर्व गोण्या घटनास्थळीच पडून असून, त्यामुळे पर्यावरण, वन्यजीव आणि जनावरांच्या आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सोलापूर ग्रामीण पोलीस दलाल मोठे फेर बदल

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर ग्रामीण पोलीस दलाल मोठे फेर बदल करण्यात आले असून सोलापूर जिल्हा वाहतूक शाखेचे भरणे टेंभुर्णी पोलीस ठाण्याला पाठविण्यात आले आहेत तर ; वैरागचे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गावडे यांची बदली सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सोलापूर चे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी काल जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या केल्या असून अक्कलकोट येथील दोन्ही पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक यांच्या तेथून बदल्या करण्यात आल्या असून त्यांना सध्या साइड पोस्टिंग करण्यात आले आहे. सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिसच्या 11 पीआय यांच्या आणि 2 एपीआय यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सोलापूर ग्रामीण पोलीस दलात प्रशासकीय कारणास्तव मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. ग्रामीण पोलीस दलातील 2 वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या 11 पोलीस निरीक्षक (PI) आणि 2 सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या (API) अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. या संदर्भातील अधिकृत आदेश पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी 29 जून 2026 रोजी जारी केले आहेत.

सोलापूर ग्रामीण पोलीस दलात कार्यरत नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक अविनाश एकनाथ पवार यांची बदली अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. तर वैराग पोलीस ठाणे ते कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक कुंदन तुकाराम गावडे यांची बदली सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे करण्यात आले आहे. नियंत्रण कक्ष येथे कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षक दीपक ज्योतिराम पाटील यांची बदली मोहोळ पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. वाहतूक शाखा येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक बाळू रसिक भरणे यांची बदली टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक अमूल शंकर कादबने यांची बदली वैराग पोलीस ठाणे येथे करण्यात आले आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दशरथ भानुदास वाघमोडे यांची बदली माळशिरस पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तय्यूब मुजावर यांची बदली पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक सुरेश गणपतराव चिल्लावार यांची बदली पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे करण्यात आले आहे. माळशिरस पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक विकास चन्नवीर दिंडुरे यांची बदली सायबर पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दीपक लक्ष्मण बरडे यांची बदली जिल्हा वाहतूक शाखा येथे करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक कमलाकर नरसिंह गड्डीमे यांची बदली नियंत्रण कक्षातून आर्थिक गुन्हे शाखा येथे करण्यात आली आहे. पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय आप्पासो सोनवणे यांची बदली बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे प्रभारी म्हणून नेमणूक करण्यात आले आहे. तर आर्थिक गणेशा येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अण्णासाहेब कड यांची बदली सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे.

## प्रतीक्षाधीन यादीतील तिसऱ्या फेरीस प्रारंभ

ठाणे : (स. गांवकरी)

शिक्षण हक्क कायदा (RTE) २००९ अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी प्रतीक्षाधीन यादीतील (Waiting List) तिसऱ्या फेरीस दि. २४ जून, २०२६ ते ०३ जुलै, २०२६ पर्यंत कालावधी देण्यात आला आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिये अंतर्गत प्रतीक्षाधीन यादीतील (Waiting List) दुसऱ्या फेरीत २८१ विद्यार्थीचे प्रवेश करण्यात आले असून एकूण ९ हजार २१५ विद्यार्थीचे प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार आणि शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दुसऱ्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रतीक्षाधीन यादीतील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी तिसरी फेरी सुरू करण्यात आली आहे. या फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आरटीई प्रवेश पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार निश्चित कालावधीत संबंधित शाळेत आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. मुदतीत प्रवेश निश्चित न केल्यास संबंधित जागा पुढील पात्र विद्यार्थ्यास उपलब्ध करून दिली जाईल. पालकांनी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, निवासाचा पुरावा, जन्मनोंद प्रमाणपत्र, आधार कार्ड तसेच शासनाने निर्देशित केलेली इतर कागदपत्रे तयार ठेवावीत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण आल्यास संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग अथवा आरटीई हेल्पडेस्कशी संपर्क साधावा.

# श्रीगोंद्यात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात संपन्न

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदार व पोलीस निरीक्षकांचा गौरव

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)




श्रीगोंदा शहरातील शनी चौक येथे लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व विचारप्रबोधन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संभाजी ब्रिगेड पार्टी, श्रीगोंदा तालुक्याच्या वतीने तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास तहसीलदार सचिन डोंगरे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे तसेच माजी उपनगराध्यक्षा अलका अनभुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी इंजि. शामभाऊ जरे व अलका अनभुले यांनी शाहू महाराजांचे सामाजिक न्याय, शिक्षण, आरक्षण, बहुजन कल्याण आणि समतेसाठीचे ऐतिहासिक योगदान अधोरेखित केले. शाहू महाराजांनी राबविलेल्या लोककल्याणकारी धोरणांमुळे समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

उत्कृष्ट प्रशासकीय कार्य, लोकाभिमुख निर्णयप्रक्रिया आणि जनतेशी असलेल्या सुसंवादाबद्दल तहसीलदार सचिन डोंगरे व पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचा संभाजी ब्रिगेडच्या वतीने शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना दोन्ही अधिकाऱ्यांनी संभाजी ब्रिगेडच्या सामाजिक व जनहिताच्या कार्याचे कौतुक केले. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा जपत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच जयंती कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. यावेळी नगरसेवक पिनू काळे, एम. डी. शिंदे, सागर महाराज गोरे, युवक नेते रुषिकेश गायकवाड, पत्रकार राजेंद्र काकडे, सुनील अनभुले, आदेश शेंडगे, मंगेश मोटे पाटील, राजेंद्र उकांडे, दीपक मखरे, कांतीलाल कोकाटे, संजय डहाळे, शिवाजी गावडे, सोपान डाके आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार योगेश चंदन यांचा वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास दिलीप लबडे (तालुका उपाध्यक्ष), रवींद्र महंडूळे (तालुका सचिव), संतोष आरडे (संघटक), पांडुरंग खोरे (उपाध्यक्ष, शेतकरी आघाडी), बापू जगताप (तालुका कार्याध्यक्ष), घनश्याम काळे (तालुकाध्यक्ष, कामगार आघाडी), सद्दाम शेख (तालुकाध्यक्ष, अल्पसंख्याक आघाडी) यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शाहूप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "राजर्षी शाहू महाराजांचे समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. त्या विचारांचा वारसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.

# थोडक्यात पण महत्वाचे

## ६०व्या वर्धापनदिनानिमित्त दिव्यात मोफत फिजिओथेरपी शिबिर



ठाणे (स. गांवकरी) : शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत दिवा येथे जनसेवेचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपत आणि पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (दि. ३० जून) रोजी बि आर नगर येथे मोफत फिजिओथेरपी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाखाप्रमुख विलास उतेकर आणि उमेश भानसे यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह अनेकांनी संधिवात, गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, खांदेदुखी आदी समस्यांवर तज्ज्ञांकडून मोफत मार्गदर्शन व उपचारांचा लाभ घेतला."शिवसेना म्हणजे केवळ राजकारण नव्हे, तर समाजकारण आणि जनसेवा" हा उपस्थितांनी संदेश देत गरजू नागरिकांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांची गरज व्यक्त केली. "ज्येष्ठांचा आशीर्वाद हीच शिवसेनेची खरी ताकद आहे," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उपक्रमास शाखाप्रमुख अनिल पवार, शशिकांत कुंभारगण, अश्विनी अडेकर, पांडुरंग बुरोडकर, श्रावणी कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार 6 जुलै 2026 रोजी दुपारी 1 ते 3 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे. या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी 12 वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल. लोकशाही दिनाच्या दिवशी प्राप्त होणाऱ्या जनतेच्या तक्रारी, अडचणी एकत्रीतरीत्या समजावून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्यात येतील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली आहे.

## आयटीआय विद्यार्थ्यांनी अनुभवले तहसील कार्यालयाचे कामकाज



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील युवक-युवतींना शासकीय कार्यालयीन कामकाजाची प्रत्यक्ष ओळख व्हावी, प्रशासकीय यंत्रणेतील पदे व जबाबदाऱ्या समजून घेता याव्या आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ व्हावा, या उद्देशाने 'अमृत' (Academy of Maharashtra Research Upliftment and Training) संस्थेच्या वतीने "अमृत संवाद सेतू उपक्रम" राबविण्यात येत आहे. या नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रमांतर्गत २५ जून २०२६ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नायगाव येथील विद्यार्थ्यांना तहसील कार्यालय, नायगाव येथे अभ्यास दौऱ्यावर घेऊन जाण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कार्यालयातील प्रत्येक विभागाची सविस्तर आणि प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. वित्त विभाग, महसूल १ व २, अभिलेख (रेकॉर्ड रूम), लेखा विभाग आणि आवक-जावक विभागाच्या प्रमुखांनी विद्यार्थ्यांना विभागाच्या कामकाजाची अतिशय महत्त्वाची माहिती देऊन मार्गदर्शन केले. दौऱ्याच्या शेवटी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शासकीय कार्यालयांची भीती मनातून काढून एक जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन त्यांनी युवकांना केले. युवकांना प्रशासनाशी जोडणाऱ्या या उपक्रमाबद्दल 'अमृत' संस्थेचे मनापासून अभिनंदन करत त्यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले अनेक प्रश्न प्रशासनासमोर मांडता आले आणि त्यांची उत्तरेही मिळाली.

## नायगावात चोरी सत्र चालु

नायगाव (स. गांवकरी) : येथील पंचायत समितीमध्ये कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असलेले माधव कौटकर यांच्या व्यंकटेश नगर मधील भाड्याच्या घरात धाडसी घरफोडी झाल्याची घटना दि. 28 रोजी रात्री उशिरा उघडकीस आली आहे. चोरट्यांनी घरातून 9 लाख 70 हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. या धाडसी चोरीच्या घटनेमुळे कौटकर कुटुंबाला जबर धक्का बसला आहे. माधव कौटकर हे नायगाव शहरातील व्यंकटेश नगर भागात मिरेवाड यांच्या घरी किरायाने राहतात. प्लॉट खरेदीसाठी करण्यासाठी म्हणून 9 लाख 70 हजारांची रक्कम घरातच ठेवली होती. दि. 26 जून रोजी ते सहकुटुंब देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. दि. 28 जून रोजी रात्री उशिरा घरी परतल्यानंतर घराचे कुलूप तोडून चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. कपाटातील प्लॉटसाठी जमवलेली संपूर्ण रक्कम गायब झाल्याने जबर धक्का बसला. चोरीची माहिती मिळताच कौटकर यांनी तात्काळ नायगाव पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. रात्री उशीर झाल्याने सकाळी दि. 29 जून रोजी सकाळी श्वान पथक व ठसे तज्ज्ञ पथकाला पाचारण करण्यात आले होते, अशी माहिती पोलीस कर्मचारी माधव पवार यांनी दिली.

## खासगी उपचारानंतर महिलेचा मृत्यू

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील राजवाडी येथील ४० वर्षीय महिलेचा तामसा येथील एका खासगी दवाखान्यात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी तामसा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, उपचारात हलगर्जीपणा झाला का, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजवाडी येथील कांताबाई मारोती आडे (वय ४०) यांना किरकोळ आजारामुळे १९ जून रोजी तामसा येथील एका खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तामसा पोलिसांनी विष्णुपुरी येथून प्राप्त झालेल्या एमएलसीच्या आधारे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. शवविच्छेदन करण्यात आले असले तरी मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, राज्यात अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून खासगी वैद्यकीय संस्थांवर कारवाई सुरू असतानाही तामसा परिसरात अनेक बोगस डॉक्टर, अनधिकृत वैद्यकीय सेवा, बेकायदेशीर लॅब आणि नियमबाह्य उपचार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, शवविच्छेदन अहवाल आणि वैद्यकीय नोंदींच्या आधारे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यामुळे चौकशी अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हदगाव तालुका अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय किनवटला जोडू नका

**भारतीय जनता पार्टी हदगावच्यावतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन**



तामसा : (स. गांवकरी)

किनवट येथे प्रस्तावित होत असलेल्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हदगाव तालुक्याचा समावेश करू नये, या मागणीसाठी भाजपाचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, सूर्यकांत हनवते, प्रदेश कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर पाटील कोळीकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी नांदेड यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. यावेळी हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब कदम उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी नांदेड यांना दिलेल्या निवेदनात हदगाव तालुका भौगोलिकदृष्ट्या नांदेडपासून केवळ 45 किमीवर आहे. तर किनवटचे अंतर 110 ते 120 किमी असून प्रवासाला 3 ते 4 तास लागतात. त्यामुळे शेतकरी, महिला, वयोवृद्ध आणि दिव्यांग नागरिकांना महसुली कामांसाठी मोठी गैरसोय होणार आहे, असे म्हटले आहे.

हदगाव तालुका प्रशासकीय, सामाजिक व भौगोलिकदृष्ट्या नांदेड जिल्हा मुख्यालयाशी सलग्न आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालय, सामान्य रुग्णालय यासह सर्व जिल्हास्तरीय कार्यालये नांदेड येथेच आहेत. त्यामुळे नागरिकांची सर्व प्रकारची ये-जा नांदेडलाच होते.

हदगावला किनवटशी जोडल्यास तालुक्यातील जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे हदगाव तालुका पूर्वीप्रमाणेच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड अंतर्गतच कायम ठेवावा आणि भविष्यात हदगाव येथेच उपविभागीय स्तरावर सुविधा वाढवाव्यात, अशी मागणी यावेळी भाजपचे चंद्रशेखर पाटील कदम तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, सूर्यकांत हनवते यांनी केली आहे.

# मुरबाड शहरात पाण्याची भीषण टंचाई

मुरबाड : (स. गांवकरी)

संपूर्ण मुरबाड तालुक्यात यावर्षी प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे भीषण पाणी टंचाई जाणवत असताना एक दुहेरी संकट सध्या मुरबाड शहरात राहणाऱ्या नागरिकांवर आले आहे. शिरवली येथील डॅमवर अवलंबून असलेल्या विकासाच्या आणाभाका घातल्या जाणाऱ्या मुरबाड शहरात मुरबाड नगरपंचायत प्रशासनाने ऐन पावसाळ्यात मुरबाडकरांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. दिवसाआड पाणी सध्या मुरबाड शहरातील नागरिकांना मिळत असल्याने विकासाचा डिंगोरा पिटवूनही सध्या मुरबाड शहराला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. मुरबाड शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १७ मध्ये सुरू असलेल्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना सध्या करावा लागत असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मुरबाड



नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना नुकतच निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात शहरातील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होईपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. लाखो रुपयांचे फ्लॅट घेणाऱ्या अनेक रहिवासी यांचे पाण्याविना जगणे मुश्किल झाले आहे त्यामुळे पाणीटंचाईची समस्या तातडीने सोडवून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे मुरबाड शहराध्यक्ष देवेंद्र जाधव यांनी दिला आहे.

# वटपौर्णिमेनिमित्त ग्रामपंचायतीचा वृक्षारोपण उपक्रम

ठाणे : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने वटपौर्णिमेचे औचित्य साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. आन्हे गावातील स्मशानभूमी व विधी घाट परिसरात वडाच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमात ग्रामपंचायत कर्मचारी, स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वृक्षारोपणासोबतच लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी सांगितले की, पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, भावी पिढ्यांना स्वच्छ, हिरवेगार आणि निरोगी वातावरण मिळावे



या उद्देशाने ग्रामपंचायतीमार्फत सातत्याने वृक्षारोपणासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांचे जतन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीचे प्रशासक, प्रशासकीय समितीचे सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मढेवडगावात मैत्री, समता आणि माणुसकीचा प्रेरणादायी आदर्श

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मढेवडगाव येथे मैत्री, सामाजिक समता आणि माणुसकीचा अनोखा आदर्श घडला आहे. महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांनी प्रेरित होत रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव येथील एस.एस.सी. बॅच १९९३–९४ मधील सर्व वर्गमित्र आणि वर्गमैत्रिणींनी आपल्या वर्गमैत्रीण सौ. सविता साळवे यांच्या कन्येच्या विवाहासाठी अन्नदान सेवेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली.



जीवनातील अनेक संघर्षांना धैर्याने सामोरे जात मुलीचा सांभाळ करणाऱ्या सविता साळवे यांच्या पाठीशी त्यांचे तीन बंधू, भावजया आणि आई कायम खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या या संघर्षाचा सन्मान करत, "ती आमची वर्गमैत्रीण आहे; तिच्या आनंदात आमचाही तितकाच सहभाग आहे," या भावनेतून सर्व मित्र-मैत्रिणींनी स्वयंस्फूर्तीने या उपक्रमात सहभाग घेतला.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे जात, धर्म, पंथ, भाषा, स्त्री-पुरुष किंवा आर्थिक स्थितीचा कोणताही भेद न करता सर्वांनी एकदिलाने अन्नदान सेवेची जबाबदारी स्वीकारली. मैत्री आणि माणुसकी या मूल्यांना सर्वोच्च स्थान देत समाजासमोर एक सकारात्मक संदेश दिला. आजच्या काळात अनेक नाती स्वार्थामुळे कमकुवत होत असताना, शाळेच्या बाकावर जुळलेली मैत्री आयुष्यभर साथ देऊ शकते, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून एका संघर्षशील आईला दिलेला आत्मविश्वासाचा आधार, तिच्या मुलीच्या नव्या आयुष्यासाठी दिलेला आशीर्वाद आणि माणुसकीवरील विश्वास दृढ करणारी कृती ठरली.

या उपक्रमात आदर्श शिक्षक मा. श्री. कुंडलीक (बाबाजी) शिर्के सर, नितीन वाबळे, शिर्के महाराज, राजुदादा काकडे, प्रवीण वाबळे, गोविंददादा मांडे, रंजना खांडेकर, भारती पवार, संजय शिर्के, दीपक मुळे, संदीप घावटे, अनिल शिर्के, शैला उंडे, बाळू काटे, छाया मांडे, सोमा गोलांडे, सुभाष डांगे, संतोष मांडे, आशिष दिवटे, संजय झावरे, रेश्मा परभणे, मीना शेळके, बाळासाहेब आहेर, आप्पा मांडे, विठ्ठल गाडेकर, आशा गाढवे, अनिल लगड, शोभा आठवे, रिजवाना शेख-पठाण, संदीप मांडे सर, सविता बारवकर, राजू काका कुलकर्णी, श्याम वाबळे, दत्ता देशमुख, सतीश मांडे, रमेश शिंदे, शंकर शिंदे, सविता कुरुमकर, सुरेखा गायकवाड, हेमा शेख, सुनंदा कार्ले-फरकांडे, सतीश झिटे, एकनाथ काकडे, प्रभाकर वाबळे, संदीप शिंदे, संदीप वाबळे, भाऊसाहेब शिंगटे आणि प्रकाश शिंदे यांनी सहभाग नोंदवला.

मढेवडगावात घडलेला हा प्रसंग केवळ एका विवाहसोहळ्यापुरता मर्यादित नसून सामाजिक समता, बंधुभाव, मैत्री आणि माणुसकीचा प्रेरणादायी संदेश देणारा आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांना बळ मिळते आणि पुढील पिढीसमोर अनुकरणीय आदर्श उभा राहतो.

"जिथे जात संपते, तिथे
मैत्री सुरू होते...
जिथे स्वार्थ संपतो, तिथे
माणुसकी फुलते...
आणि जिथे माणुसकी
फुलते, तिथेच समाजाचा
खरा विकास घडतो

# मुशाफिरी यात्रेचा लिंपणगावात समारोप; संघर्षाची ग्वाही

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

भटके-विमुक्त आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी राजकीय सत्तेत सहभाग आवश्यक असून, त्यासाठी समाजाने एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

भटके-विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या वतीने संत कबीर जयंतीनिमित्त लिंपणगाव येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरातील सभागृहात आयोजित 'मुशाफिरी यात्रा' समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक व भटके-विमुक्त नेते लक्ष्मण गायकवाड होते.

यावेळी स्वागताध्यक्ष तथा वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव, उमाताई जाधव, प्रसाद भिवसने, नगरसेविका संगीता भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते. सुजात आंबेडकर



म्हणाले की, भटके-विमुक्त समाजाने स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान दिले, मात्र स्वातंत्र्यानंतरही या समाजाला घर, जमीन, शिक्षण, रेशन आणि इतर मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. या प्रश्नांच्या निराकरणासाठी वंचित बहुजन आघाडीने भटके-विमुक्त समाजाला सत्तेत प्रतिनिधित्व मिळवून देण्याचा संकल्प केला आहे.

यावेळी त्यांनी ॲड. डॉ. अरुण जाधव यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत, भटके-विमुक्त समाजासाठी ते प्रभावी नेतृत्व म्हणून पुढे येत असल्याचे सांगितले आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात लक्ष्मण गायकवाड यांनी सांगितले की, स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही भटके-विमुक्त समाज अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. समाजाने अंधश्रद्धा, जुन्या रूढी-परंपरा सोडून शिक्षणाचा मार्ग स्वीकारावा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालत संघटित व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी सांगितले की, घरगणना व जनगणना प्रक्रियेत भटके-विमुक्तांच्या पाल व तात्पुरत्या निवासस्थानांची नोंद करण्यासाठी आवश्यक व्यवस्था नसल्याने अनेक कुटुंबे वंचित राहण्याची शक्यता आहे. मुशाफिरी यात्रेदरम्यान समाजात जनजागृती करून अनेक कुटुंबांची घरगणना होण्यास मदत झाली असून, भटके-विमुक्तांच्या विविध प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलने, मोर्चे आणि निवेदने देत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.


कार्यक्रमात बाळासाहेब बळे, लता सावंत आणि अनिल घनवट यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा संविधानाच्या उद्देशिकेची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. तसेच समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमासाठी चोख पोलिस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली.

# फेरीवाल्यांवर कारवाईसाठी वाहनासह अपुरे मनुष्यबळ

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा परिसरात वाढत्या अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांना होणारा त्रास आणि सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमणाच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त मनुष्यबळ आणि वाहनांची मागणी केली आहे. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी शिवप्रसाद नागरगोजे यांनी पाठविलेल्या पत्रात दिवा प्रभागातील अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या, बॅनर, पोस्टर आणि होर्डिंग हटविण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ अपुरे असल्याचे नमूद केले आहे. सध्या सकाळच्या सत्रात केवळ २० कामगार, २ पिकअप वाहने आणि दुपारच्या सत्रात १५ कामगार व १ पिकअप वाहन उपलब्ध असल्याने प्रभावी कारवाई करण्यात अडचणी येत असल्याचे पत्रात म्हटले



आहे. दिवा रेल्वे स्थानक, आगासन रोड, मुंब्रा देवी कॉलनी, शिलफाटा, कल्याणफाटा, बायपास जंक्शन, शिलवली नगर, दत्तोली कॉम्प्लेक्स आदी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी होत असून शाळकरी विद्यार्थी, महिला आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# तामसा वन विभागाचा वटपौर्णिमेनिमित्त स्तुत्य उपक्रम

**महावितरण कार्यालय परिसरात वटवृक्षाचे वृक्षारोपण : महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**



तामसा : (स. गांवकरी)

तामसा वन परिमंडळाच्या वतीने वटपौर्णिमेचे औचित्य साधून शहरातील महावितरण कंपनी कार्यालय परिसरात वटवृक्षाचे 10 व काही बेलाची रोपे लावून वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात वटवृक्ष पूजनास आलेल्या महिलांनी उत्साहाने सहभाग घेऊन लावण्यात आलेल्या वटवृक्षाचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

भारतीय संस्कृतीत वटवृक्षाला धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय विशेष महत्त्व आहे. वटपौर्णिमेनिमित्त महिलांनी वटवृक्षाची पूजा करून व प्रदक्षिणा घालून आपल्या जोडीदाराला दीर्घायुष्य व कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. त्याचबरोबर "एक वृक्ष, हजारो जीवांचे संरक्षण" हा संदेश देत आणि वटपौर्णिमेचे औचित्य साधून तामसा वन परिमंडळात नव्याने रुजू झालेले वनरक्षक बालाजी बनसोडे यांनी वटवृक्षाचे वृक्षारोपण करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि घटणारे जंगल क्षेत्र लक्षात घेता अशा उपक्रमांची अधिक गरज असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. महावितरण कंपनी कार्यालय परिसरात लावण्यात आलेल्या वटवृक्षाचे नियमित संगोपन करून तो भविष्यात मोठा वृक्ष म्हणून विकसित करण्याचा संकल्प वीज कंपनीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी केला. महिलांनीही वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण रक्षणासाठी अशा उपक्रमांत सातत्याने सहभागी होण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी तामसा येथील माजी सरपंच आनंदराव पाटील घंटलवार, मेडिकल संघटनेचे रमेश तावडे, घोगरी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन किशोर पाटील घंटलवार, वन विभागाचे वनरक्षक बालाजी बनसोडे, महावितरणचे सहाय्यक अभियंता विनोद वाठोरे, सहाय्यक अभियंता प्रदीप नन्नवरे, वरिष्ठ यंत्रचालक सचिन सोनसळे, साईनाथ केतनवार, संदीप जाधव, कैलास कल्याणकर, वनमजूर अशोक चव्हाण, बाबू चव्हाण व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.